**दूरध्वनी क्रमांक :**
०२०-२५६९१३४१, २५६०१२०३
२५६०१२१८, २५६९६०६१
२५६९००६२, २५६९००६०
२५६९७२३२

# पुणे विद्यापीठ

*परीक्षा विभाग*
**गणेशखिंड, पुणे ४११ ००७**
**टेलिग्राफ : 'युनिपुना'**
**फॅक्स : ०२०-२५६९१३४१**
**Website : www.unipune.ac.in**
**e-mail : coe@unipune.ac.in**

संदर्भः परीक्षा-समन्वय/७५५ दिनांकः- २०.०६.२०११

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये.

विषय :- प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान, बीबीए, बीसीए, बीबीएम (आयबी) इ. परीक्षा महाविद्यालयाकडे वर्ग केल्यानंतर परीक्षा आयोजन, उत्तरपत्रिका तपासणे, परीक्षेचे निकाल तयार करणे अशा विविध प्रक्रियेत प्रत्यक्षातील अडचणी / त्रूटींबाबत..

संदर्भ :- १. परीक्षा/समन्वय/१५६२ दि. २० डिसेंबर, २०१०
२. परीक्षा/समन्वय/१६३ दि. २ फेब्रुवारी, २०१०

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित क्र. १ च्या परिपत्रकास अनुसरुन, दिनांक २६/२७ मार्च, २०११ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकित मा. अधिसभेने केलेल्या ठरावानुसार प्रथमवर्ष कला, वाणिज्य, विज्ञान, बीबीए, बीसीए, बीबीएम (आयबी) इ. परीक्षा महाविद्यालयाकडे देताना त्याअनुषंगिक बाबींचा विचार करुन अहवाल सादर करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीस त्यांनी सादर केलेला अहवाल पुनःश्च त्यांच्याकडेच पुनर्विचारार्थ ठेवण्यात येत आहे. सदर अहवालातील मुख्यतः परीक्षा आयोजनातील खालील कामकाजाविषयी विचार करण्यात येणार आहे.

१. परीक्षापुर्व कामे
२. प्रत्यक्ष परीक्षेची कामे
३. परीक्षोत्तर कामे

वरील नमुद कामकाजातील प्रक्रियेसंदर्भात प्रत्यक्ष उदभवलेल्या आर्थिक बाबींशी निगडीत सदर समिती पुनर्विचार करणार असून समिती पुढे सदर प्रक्रियेत आलेल्या प्रशासकीय अडचणी/त्रूटीविषयीही विचार करुन योग्य तो निर्णय सादर करणार असल्याने, आपणांस विनंती करण्यात येते की, याबाबत आपणांस प्रत्यक्ष परीक्षा आयोजनातील वरील मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत आर्थिक व प्रशासकिय संदर्भातील संपूर्ण प्रक्रियेत आलेल्या अडचणी व त्रूटी मुद्दानिहाय दिनांक ३० जून, २०११ पूर्वी मा. परीक्षा नियंत्रक यांच्याकडे कळविण्यात याव्यात, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासु,

(डॉ. शि.मो. आहिरे)
परीक्षा नियंत्रक